# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**रूपये:- १,१२,९७,८०,५१,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१) | १४३६ | १० | श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघातील जल जीवन मिशनच्या ४३ योजनांपैकी फक्त ६ योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. या योजनांची कामे अपूर्ण अवस्थेत असून या कामांचे अंदाजपत्रक अवास्तव रित्या वाढवलेले आहे. ही कामे अपूर्ण अवस्थेत असल्याने झालेला खर्च वाया गेल्याचे दिसून येत आहे व यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. याबाबत तपास करून दोषींवर कारवाई होणे आवश्यक तसेच कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. मनोज जामसुतकर** |
| (२) | १२६५ | १० | मुंबईतील भायखळा मतदार संघातील हत्तीबाग, नारळवाडी, ताडवाडी, लव्हलेन बीआयटी चाळ, मदनपूरा, आग्रीपाडा या भागात तसेच मुंबई पोर्टट्रस्टच्या मालकीच्या दारुखाना येथील जयभिम नगर, कसारा बंदर, रेती बंदर, लकडा बंदर 1 व 2, दर्गा गल्ली, पावडर बंदर, कोळसा बंदर, कौला बंदर इत्यादी भागत गेल्या अनेक दिवसांपासून अस्वच्छ व अपुरा पाणी पुरवठा होत असणे, या भागात पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईन्स जीर्ण झालेल्या असून जागोजागी फुटलेल्या असणे, त्यामुळे या भागातील नागरीकांना अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असणे, याबाबत वारंवार तक्रारी करुनही कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, शासनाने सदर भागातील नागरीकांना स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी सक्षम उपाययोजना करण्याची आवश्यकतेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अमित झनक** |
| (३) | १३४० | १० | जलजीवन मिशन योजने अंतर्गत रिसोड व मालेगांव जि.नाशिक तालुक्यातील अर्धवट काम झालेल्या योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय देरकर** |
| (४) | १४०१ | १० | राज्य शासनाने पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून हर घर नल घर घर जल या भूमिकेतून प्रत्येक गावात पाणी पुरवठा योजना सुरु करणे, नळ योजनेचा कार्यक्रम उपक्रम हाती घेतला परंतु सर्वच जिल्ह्यांमध्ये ठेकेदाराने एकापेक्षा अनेक काम घेतल्याने सदर काम करताना ठेकेदार यांनी एका पेक्षा अनेक कामे घेणे आर्थिक अडचणी लक्षात घेता ती कामे अपुऱ्या स्थितीत असणे कामे करीत असताना कुठल्याही प्रकारचे तांत्रिक बाबी पडताळून कामे न करणे, तसेच कामे करत असताना कामाची गुणवत्ता व दर्जा न राहणे आणि जवळच्या ठेकेदारांना एका पेक्षा कामे अधिकारी यांनी देणे. ठेकेदार यांनी राजकीय पाठवाळाच्या भरवश्यावर अधिकारावर प्रेशर टाकून काम मुदतीच्या आत कामे पूर्ण न करणे, अशा गंभीर बाबी असताना ही कामे आजही अपुरे आहेत आणि त्या अपुऱ्या कामामुळे ग्रामीण भागामध्ये पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि या पाणीटंचाईतून या प्रशासनाच्या माध्यमातून कामावर खर्च होणे पाणीपुरवठा होऊ न शकल्याने पाणी टंचाई निर्माण झाल्याने पाण्याचे टँकर लावण्याचे स्थिती निर्माण होणे, तसेच पेडगाव, वानोजा, ता. मंगरुळपीर जिल्हा वाशिम येथील जीवन प्राधिकरण विभागाच्या माध्यमातून कामे अपुरे असणे त्यामुळे पाणी गावाकऱ्यांना पाणी न मिळणे त्या मुळे गावाकऱ्यांनी खासदार महोदय यांचेकडे पाणी मिळण्याची मागणी करणे खासदार महोदय यांनी अधिकारी यांना फोन वरून संपर्क करणे, शेंदुर्जाना मोरे येथील कामाची चौकशीची मागणी ग्रामपंचायत सदस्य यांनी करणे, वाशिम जिल्ह्यातील पाणी टंचाई लक्षात घेतल्यास ज्या ज्या ठिकाणी योजना मंजूर व कामे सुरु असताना टँकर लावण्याची परिस्थिती निर्माण होणे, त्या ठिकाणचा खर्च सदर ठेकेदार व अधिकारी यांचे कडून वसुल करणे,पर्याय शासनाचा दोन वेळा खर्च वाचविणे, अशी अनेक गावातील गावकऱ्याला पाणी टनचाईचा त्रास होणे, याबाबत ग्रामपंचायतच्या वतीने वारंवार मागणी करूनही सादर ठेकेदाराने आणि त्या विभागाने या कामे तांत्रिक दृष्ट्या कामे न करणे, अशी कामे वाशिम जिल्ह्यात, मंगरुळपीर तालुक्यात सोनखस, शहापूर ग्रामपंचायत अंतर्गत ही योजना आहे, सदर ठेकेदार यांनी अपुरे नळ कनेक्शन लावणे 4500 कनेक्शन ची गरज असणे, 1500 नळ जोडणी करणे अपुरी पाईप लाईन टाकणे, यां मुळे तालुक्यातील ग्रामपंचायत असलेल्या नागरिकांना पाणी टंचाई भासणे, सदर कामे मुदतीत न होणे अधिकारी यांनी कामे करताना नागरिका ऐवजी ठेकेदार |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यांना प्राधान्य देणे, त्या मुळे गावकऱ्यांना होत असलेला त्रास लाक्षत घेणे, आणि नागरिकांना पाण्याचा होत असलेला त्रास पाहता शासनाप्रति वाढत चाललेला असंतोष पाहता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (५) | १४१२ | १० | मौजे मांजरी खुर्द, ता. हवेली येथील सन २०११ नुसार लोकसंख्या ४५५९ असून गावासाठीची विद्यमान पाणीपुरवठा योजना सन २००८–०९ मध्ये सुरू झाली आहे. सध्या इंदिरानगर व गावठाण मिळून सुमारे १,४०,००० लिटर क्षमतेची योजना असून ती केवळ गावठाणापुरती मर्यादित आहे. पवार वस्ती, वाघजाई वस्ती, वाघोली रोड, मानकाईनगर, खंडोबा माळ तसेच VTP व Godrej परिसरात पाणीपुरवठा व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना विहीर व टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. तसेच वाढत्या नागरीकरणामुळे सध्या लोकसंख्या सुमारे २५,००० पेक्षा अधिक झाली असून दररोज किमान १४ लाख लिटर पाण्याची आवश्यकता आहे. पुढील काही वर्षांत लोकसंख्या ४०,००० च्या पुढे जाण्याची शक्यता असून सुमारे १ कोटी लिटर पाण्याची गरज भासणार आहे. त्यामुळे मांजरी खुर्द वाघोली सह पुणे महानगरपालिका आणि पीएमआरडीएने संयुक्त पाणी योजना राबविणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १४१७ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील मौजे वडगाव शिंदे हे गाव पुणे महानगरपालिका हद्दीलगत असून येथे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे येथील विद्यमान पाणीपुरवठा योजना नजीकच्या काळात अपुरी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी भविष्यात या परिसरात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. वाढत्या नागरीकरणाचा विचार करून येथील पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी सुधारित पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (७) | १३८१ | १० | ता. कुरखेडा, कोरची जि. गडचिरोली याभागातील दुर्गम आदिवासी भागातील सर्व गावांना पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे गावांना भीषण पाणी टंचाईला समोरे जावे लागते, याकरिता शासनाने नळ पाणी पुरवठा योजना त्वरीत या दोन तालुक्यातील गावांना देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | १३८९ | १० | ता. कुरखेडा, कोरची व आरमोरी, जि. गडचिरोली येथील दुर्गमभागातील गावांमधील पाणी पुरवठा विभागामार्फत सोलर पंपावर आधारित पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १३९८ | १० | गडचिरोली जिल्हातील ग्रामीण भागामध्ये ग्रामस्थांना सुरळीत पिण्याचे पाणी मिळावे यासाठी शुध्द पिण्याच्या पाणी साठवण टाक्या बसविणे व ज्या पाईपलाईनद्वारे ग्रामस्थांना पाणीपुरवठा होतो त्या पाईपलाईनची दुरुस्ती करणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १४०६ | १० | ता. आरमोरी, जि.गडचिरोली येथील वडसा नगरपंचायती हद्दीतील सांडपाण्याचे स्वच्छ भारत मिशन अंर्तगत सांडपणी व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (११) | १४१४ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील भिवापूर, कुही व उमरेड या तालुक्यांमध्ये "जल जीवन मिशन" अंतर्गत एकूण 337 पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आलेल्या आहेत. या योजनांसाठी एकूण ₹139.94 कोटी इतका खर्च मंजूर करण्यात आला आहे.यापैकी 206 योजना पूर्ण झालेल्या असून 126 योजना सध्या प्रगतीपथावर आहेत. या योजनांवर आतापर्यंत ₹66.31 कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. मात्र पूर्ण झालेल्या कामांच्या देयकांसाठी केंद्र शासनाकडून ₹6.14 कोटी इतका निधी अद्याप प्रलंबित आहे. तसेच उर्वरित योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी एकूण ₹73.63 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ₹40.58 कोटी तर राज्य शासनाचा हिस्सा ₹33.06 कोटी इतका आहे.केंद्र शासनाकडील निधी प्रलंबित असल्यामुळे अनेक कामांच्या देयकांमध्ये अडचणी निर्माण होत असून कामांच्या गतीवर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने केंद्र शासनाकडील निधी प्राप्त होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात केंद्राच्या वाट्याएवढा निधी उपलब्ध करून देऊन कामांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात व केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर संबंधित रकमेचे समायोजन करण्यात यावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | १४२३ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील नागपूर जिल्हा परिषद स्तरावर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा–२ व जलजीवन मिशन अंतर्गत गेल्या जवळपास दोन दशकांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर २०२५ ते |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जानेवारी २०२६ या कालावधीतील चार महिन्यांचे मानधन अद्याप अद्यतनित व अदा केलेले नाही.या थकीत मानधनामुळे कर्मचाऱ्यांनी दि. ४ फेब्रुवारी २०२६ पासून कामबंद आंदोलन पुकारले असून, परिणामी स्वच्छ भारत मिशन व जलजीवन मिशनच्या कामांमध्ये पूर्ण ठप्प झाले आहे. यामुळे वार्षिक कृती आराखडा, क्षेत्रीय तपासणी, ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण तसेच दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर गंभीर परिणाम झाला आहे.सदर मानधन थकीत राहण्यामागे प्रशासकीय दिरंगाई किंवा निष्काळजीपणा कोणत्या स्तरावर झाला आहे, तसेच जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली किंवा करण्यात येणार आहे, याची माहिती शासनाने द्यावी. शासनाने तातडीने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन अदा करावे, कामबंद आंदोलन मागे घेण्यास प्रवृत्त करावे आणि भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१३) | १३१५ | १० | मौजे वारळ (तालुका-म्हसळा, जिल्हा-रायगड) येथे जल जीवन मिशन योजनेंतर्गत नळपाणी पुरवठा योजना मंजूर झालेली असून, योजनेचा मुळ उद्भव मेंदडी धरणातून घेण्यात आलेला असणे, सद्य:स्थितीत मेंदडी धरणातून मेंदडी, वारळ, कालसुरी, तुरुंबाडी या चार ग्रामपंचायत हददीतील गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. मेंदडी धरण दगड-माती, चिखल गाळाने भरले असल्याने धरणाच्या अपुऱ्या पाणी साठवण क्षमतेमुळे दरवर्षी फेब्रुवारी अखेर धरणात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवणे. मेंदडी धरणातील पाणी दरवर्षी फेब्रुवारी अखेर कमी होत असल्याने, धरणाचे लगतचे परिसरात गुरे-ढोरे, इतर प्राणी फिरताना दिसणे. धरणातील पाण्याने तळ गाठल्याने गाळयुक्त गढूळ पाणी ग्रामस्थांना प्यावे लागते, त्यामुळे दरवर्षी गावात जलजन्य साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होवून ग्रामस्थांना आजाराला सामोरे जावे लागते. उन्हाळयाचे दिवस असल्याने मौजे वारळ गावातील नागरीकांना पुरेसा पाणी पुरवठा होण्याकरीता मेंदडी धरणातील पाणी अपुरे पडत असल्याने, मौजे वारळ गावाकरीता मेंदडी धरणाऐवजी शासनाच्या जल जीवन मिशन योजनेंतर्गत मौजे खरसई धरणातून पाणी पुरवठा करावा, अशी मागणी ग्रामपंचायत, वारळ यांनी एप्रिल, २०२३ पासून (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हापरिषद, अलिबाग (२) कार्यकारी अभियंता (ग्रापापु), रा.जि.प., अलिबाग (३) उपअभियंता (ग्रापापु), रा.जि.प.उपविभाग, म्हसळा यांच्याकडे सातत्याने करणे, वारळ ग्रामपंचापयतीच्या मागणीनुसार जल जीवन मिशन अंतर्गत मौजे वारळ नळ पाणीपुरवठा योजनेचे खरसई धरणावर आधारित रुपये २,५१,१९,४९५/- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक जल जीवन मिशन विभाग, म्हसळा यांचेकडून तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकाची छाननी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगाव, अलिबाग यांचेकडे प्रलंबित असणे, मौजे वारळ गावातील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याच्या या जीवनावश्यक मागणीकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सातत्याने केलेले/होत असलेले दुर्लक्ष, परिणामी, मौजे वारळ गावातील ग्रामस्थांमध्ये शासनाच्या निष्क्रीयतेमुळे पसरलेला तीव्र असंतोष, ग्रामस्थांना पिण्यासाठी पुरेसे शुध्द पाणी मिळत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची लाट, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई